**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार इमारत, दालन क्र. ४१६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई -४०० ०३२.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२३/प्र.क्र.१७१/साशि-७ दिनांक: ६ सप्टेंबर, २०२३

**प्रति,**

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,
सर्व कृषी/अकृषी/संस्कृत/मुक्त/आरोग्य/
तंत्रज्ञान विद्यापीठ, +२ स्तर/व्यवसाय/तंत्रशिक्षण संस्था

**विषय:- मा. मंत्रीमहोदय यांनी आदेशित केल्याप्रमाणे "मेरी माटी मेरा देश" कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन करणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार मा. मंत्रीमहोदय श्री. चंद्रकांत (दादा) पाटील उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सर्व रासेयो संचालक तथा समन्वयकांच्या बैठकीत व दि.२५ ऑगस्ट, २०२३ च्या डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठातील मा. कुलगुरुंच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मा. मंत्री महोदयांनी आदेशित केल्याप्रमाणे खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे उपक्रम राबविण्यात यावा.

१) दिनांक <u>०६ ते २१ सप्टेंबर, २०२३</u> या कालावधीत विध्यार्थ्यींनी एक मूठ माती गोळा करुन हातात माती घेऊन ती अमृत कलशामध्ये टाकतानाचा सेल्फी काढावा व तो पुढे दिलेल्या लिंकवर अपलोड करावा. https://selfiewithmerimaati.in/photoupload/

२) दिनांक <u>०३ ते १३ ऑक्टोंबर, २०२३</u> या कालावधीत प्रत्येक महाविद्यालयात किमान ७५ रोपांची अमृत वाटीका/अमृत वन/अमृत कोपरा/अमृत कुंडी/अमृत गार्डन तयार करणे.

३) <u>दिनांक १४ ते २० ऑक्टोंबर, २०२३</u> संकलित केलेल्या मातीचा एक कलश तालुक्याच्या एका महाविद्यालयात जमा करणे.

४) <u>दिनांक २८ व २९ ऑक्टोबर, २०२३</u> रोजी प्रत्येक तालुक्याचा एक कलश असे महाराष्ट्रातील सर्व तालुक्याचे कलश मुंबई येथे एकत्रित करण्यात येतील.

त्यानुषंगाने आपल्या विद्यापीठातंर्गत सर्व महाविद्यालयात वरील वेळापत्रकाप्रमाणे सदरील उपक्रम राबविणे बाबत नियोजन करण्यात यावे.

**"मेरी माटी मेरा देश"** या उपक्रमाची गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद करावयाची असल्यामुळे सर्वांचा सहभाग (मित्र/कुटूंब सदस्य/नातेवाईक इ.) महत्वाचा आहे. उपक्रम यशस्वीपणे राबवून त्याबाबतचा प्रगती अहवाल दर शुक्रवारी शासनास सादर करावा.

Rameshwar
6/9/23

**(डॉ. रामेश्वर कोठावळे)**
**राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी**
**रासेयो, मंत्रालय कक्ष, मुंबई**